महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

सीमेलगतच्या राज्यांमधून महाराष्ट्रात येणा-या व बाहेर जाणा-या मालवाहतुकीतील अनागोंदी कारभाराला आळा घालण्याबाबत

(१) १६१० (२२-१२-२०१४). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्नाटक, आंध्रप्रदेश, छत्तीसगड, गोवा मध्यप्रदेश आणि गुजरात या सीमेलगतच्या राज्यांपासून महाराष्ट्रात येणा-या व बाहेर जाणा-या मालवाहतुकीतील अनागोंदी कारभाराला आळा घालण्यासाठी उभारण्यात येणा-या बॉर्डर चेकपोस्टचे काम जमीन संपादनाच्या अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व महसूलात वाढ होण्यासाठी या जमीनी तात्काळ संपादित करण्याबाबत कोणती तातडीने उपाययोजना केली आहे,

(३) याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. एकनाथराव खडसे (१५-०९-२०१५) : (१), (२) व (३) **नाशिक** विभागातील मौजे गुलीउंबर, ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार येथील संपादित करावयाच्या जागेस स्थानिक नागरिकांचा विरोध आहे. त्यामुळे पर्यायी जमीन संपादनाबाबतचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, तळोदा भाग, तळोदा यांनी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, नंदुरबार यांना सादर करण्याबाबत कळविले आहे.

तसेच जळगाव जिल्ह्यातील सीमा तपासणी नाक्यासाठी जमीन संपादनाचा निवाडा दि.४.१२.२०१० रोजी भूसंपादन अधिकारी, जळगाव यांनी पारित केला. सीमा तपासणी नाक्यासाठी आवश्यक असलेल्या जमिनीचा दर वाटाघाटीने रु. ४० लाख प्रति हेक्टर ठरविण्यात आल्याने याप्रकरणी मा.उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र.१०५८१/२०१० ही जिल्हा समिती व संबंधित शेतकऱ्यांनी मागे घेतली आहे. तथापि, सदर दर मंजूर करण्यापूर्वी दि.४.१०.२०१० चा निवाडा रद्द करणे आवश्यक असल्याने सदर प्रकरण दि. १५.५.२०१३ रोजी विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांच्याकडे सादर करण्यात आले. सदर प्रस्ताव विभागीय

आयुक्त, नाशिक विभाग यांनी त्रुटी पुर्ततेसाठी परत केला आहे. जिल्हाधिकारी, जळगांव यांच्याकडे सदर प्रस्ताव त्रुटींची पुर्तता करण्यावर प्रलंबित आहे.

नागपूर विभागातील नागपूर जिल्हयात मौजे खुर्सापार, हिवरा बेंडे, भिलेवाडी , कांद्री व देवळी येथे, गोंदिया जिल्हयात मौजे देवरी येथे व चंद्रपूर जिल्हयात मौजे लक्कडकोट येथे जमीन संपादित करण्यात आलेली आहे.

कोकण विभागातील पालघर जिल्हयात मौजे दापचर, ता.तलासरी येथील महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांच्या सीमेलगत असलेल्या राष्ट्रीय महामार्ग क्र.८ वरील चेकपोस्टचे जमीन संपादनाचे काम पूर्ण झालेले असून चेकपोस्टवर वाहतूक सुरु आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयातील गोवा राज्याच्या सीमेलगत सावंतवाडी तालुक्यातील मौजे सटमटवाडी येथे सीमा तपासणी नाक्याच्या भूसंपादनाचे काम पूर्ण करण्यात आले असून दि.२२.८.२०१२ रोजी संपादन संस्थेकडे जमिनीचा ताबा देण्यात आलेला आहे.

पुणे विभागातील सोलापूर जिल्हयातील मौजे नांदणी, ता.दक्षिण सोलापूर येथे बीओटी तत्वावरील संगणकीकृत सीमा तपासणी नाका दि.१.७.२०१३ पासून कार्यान्वित झालेला आहे. तसेच मौजे मरवडे, ता.मंगळवेढा येथील सीमा तपासणी नाका बीओटी तत्वावर करण्यासाठी मौ.कात्राळ, ता.मंगळवेढा येथील ९ हे. १२ आर सरकारी जमीन मिळण्याकरिता जिल्हाधिकारी, सोलापूर (महसूल शाखा) यांनी दि.२.१२.२०१४ च्या पत्रान्वये प्रधान सचिव (महसूल) यांच्याकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.

औरंगाबाद विभागातील मौ.पिंपळगाव, ता.देगलूर, जि.नांदेड येथील खाजगी जमीन संपादनाऐवजी तेथील ५ हे.आर. गायरान जमीन उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

सी लिंकसाठी जमीन संपादनाची मुदत दिनांक २० डिसेंबर, २०१४ रोजी संपल्याबाबत

(२) ८६०५ (०४-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रकल्पग्रस्तांना आणि शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता होत नसल्याने न्हावा-शिवडी सागरी सेतू प्रकल्पग्रस्त संघटनेने सी लिंकसाठी होणारे सर्वेक्षण आणि मोजणी राखून ठेवण्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१४ दरम्यान उघडकिस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सी लिंकसाठी जमीन संपादनाची मुदत दिनांक २० डिसेंबर, २०१४ रोजी संपली,आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या संदर्भात शासन काय कार्यवाही करणार आहे वा केली आहे,

(५) नसल्यास, कार्यवाहीस होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१५-०९-२०१५) : (१) होय.
(२), (३),(४) व (५) मुदत संपलेली नाही. मौजे जासई, ता.उरण, जि.रायगड, प्र.क्र.४/२००६ येथील जमीन नवी मुंबई प्रकल्पांतर्गत शिवडी-न्हावा रस्त्यासाठी संपादन करण्याबाबतचा प्रस्ताव मौ.जासई येथील शेतकऱ्यांच्या प्रखर विरोधामुळे संयुक्त मोजणी न झाल्याने दि.२०.१२.२०१४ रोजी व्यपगत झाला होता. परंतु मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांच्या रिट याचिका क्र.४२७४/२०१४ मधील निर्णयाप्रमाणे व भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील कलम ११ (क) च्या तरतुदीप्रमाणे निवाडा जाहीर करण्यास दि.२२.४.२०१५ पर्यंत मुदत मिळाल्यामुळे नवी मुंबई प्रकल्पांतर्गत उभारण्यात येणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व तदनुषंगिक कामांसाठी तसेच नवी मुंबई प्रकल्पासाठी जमिनीचे संपादन करण्याबाबतच्या दि.१.३.२०१४ च्या व नवी मुंबई प्रकल्पासाठी तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व तदनुषंगिक कामांसाठी करण्यात येणाऱ्या जमिनींच्या संपादनाचे बाबतीत कार्यप्रणाली विहित करण्याबाबतच्या दि.१६.६.२०१४ च्या शासन निर्णयांच्या तरतुदींनुसार सदर प्रस्तवावर उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र.१. उरण यांच्याकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा खाडीतून बेकायदा रेती उपसा होत असल्याबाबत.

(३) ८९४४ (०४-०४-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा खाडीतून बेकायदा रेती उपसा करीत असल्याचे जानेवारी,२०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात उघडकीस आले हे, खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार रेती उपसा करणाऱ्या रेती माफीयावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (२१-०९-२०१५) : (१), (२) व (३) ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा खाडीतून अवैध रेती उत्खनन झाल्याचे माहे, डिसेंबर, २०१४ व फेब्रुवारी,२०१५ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे. सदर अवैध रेती उत्खननाबाबत नियमानुसार कारवाई करुन, संबंधितांवर गुन्हे दाखल केले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे किरकसाल (ता.माण, जि.सातारा) येथील जमीन वन विभागाकडे वर्ग करण्याच्या आदेशाला स्थगिती देण्याच्या मागणीबाबत

(४) ९००३ (०४-०४-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे किरकसाल (ता.माण, जि.सातारा) येथील भूमापन गट क्रमांक ५९० हा महसूल विभागामार्फत व्यवस्थापनासाठी किरकसाल सामुदायिक शेती संस्था यांच्या ताब्यात असून जमीन वन विभागाकडे वर्ग करण्याच्या आदेशाला स्थगिती देण्याची मागणी मा.मुख्यमंत्री, महसूल मंत्री यांचेकडे सचिव, किरकसाल सामुदायिक शेती सहाकरी संस्था यांनी दिनांक ९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आह, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाह केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) : (१) किरकसाल सामुदायीक शेती संस्था, किरकसाल ता.माण, जि.सातारा यांचा अशा स्वरुपाची मागणी करणारा अर्ज प्राप्त झाला आहे.

(२) उक्त अर्जाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी सातारा यांनी सविस्तर चौकशी केली आहे. मौजे किरकसाल, ता.माण,जि.सातारा येथील जुना स.नं. ८४ मधील ६३१.४३ हे.आर. जमीन शासन राजपत्र दि.२२/११/१८९४ अन्वये "राखीव वन" म्हणून घोषीत करण्यात आली होती व व्यवस्थापनासांठी महसूल विभागाच्या अखत्यारीत होती. सदर जमिन जॉईंट फार्मिंग को-ऑप सोसायटी लि. किरकसाल यांना दहा वर्षांसाठी भाडेपट्टयाने दि.५/४/१९४९ रोजी देण्यात आली होती. सदर जागेचा भाडेपट्टा संपुष्टात आल्यानंतरही जमीन ताब्यात ठेऊन संस्थेने शर्तभंग केला असल्याची बाब निदर्शनास आली आहे. सदर जमीन राखीव वनक्षेत्र म्हणून घोषित केली असून वन संवर्धन अधिनियम १९८० तथा मा.सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय विचारात घेता सदर जमीन वन विभागास वर्ग करणे आवश्यक असल्याने या जमिनीबाबतची संस्थेची मागणी मान्य करता येत नाही असे किरसाल सामुदायिक शेती सहकारी सोसायटी मर्यादित या संस्थेस दि.२९/५/२०१५ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, सातारा यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

अमरावती जिल्हयातील वाहणाऱ्या आकरा नद्यावर असलेल्या ८१ घाटावरील वाळूचा लिलाव होत नसल्याबाबत

(५) ९२८३ (०४-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील वाहणाऱ्या आकरा नद्यावर असलेल्या ८१ घाटावरुन वाळू उपसा करण्यात येतो मात्र या वाळूचा लिलाव होत नसल्यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असल्याचे माहे जानेवारी,२०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ८१ घाटावरील वाळूचा त्वरीत लिलाव करण्यात येवून शासनाच्या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथराव खडसे (११-०९-२०१५) : (१) व (२) सन २०१४-१५ या वर्षाकरीता अमरावती जिल्हयातील ८१ वाळूघाटांना पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्यानंतर दि.२० जानेवारी, २०१५ ते दि. १७ मार्च, २०१५ या कालावधीत एकूण ६ फेऱ्यांमध्ये ८१ वाळूघाटांपैकी, ६८ वाळूघाट लिलावात गेले आहेत. सदर ६८ वाळूघाटांच्या लिलावातून रुपये ७,९०,६४,४२७/- इतका महसूल शासनास प्राप्त झाला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील तलाठी पदांच्या रिक्त पदांबाबत

(६) ९५५० (०४-०४-२०१५). श्री.नारायण पाटील (करमाळा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा तहसिल (जि.सोलापूर) अंतर्गत तलाठयांच्या जागा रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ११८ गावांसाठी केवळ ४५ तलाठी पदे मंजूर असून यापैकी ४३ तलाठयांवरच कामकाज चालते हे खरे आहे काय,
(३) असल्यास, करमाळा तालुक्याची लोकसंख्या विचारात घेता तलाठीची पदे वाढविणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, महाराष्ट्र राज्य तलाठी पदाबाबतची २६ वाढीवपदाचा प्रस्ताव व मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने याबाबत कोणती, कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :(१),(२), (३), (४) व (५)
करमाळा तहसिल, जिल्हा सोलापूर अंतर्गत तलाठींची एकूण ४८ पदे मंजूर असून त्यापैकी ४६ पदावर तलाठी कार्यरत आहेत. नवीन सजा निर्मितीसाठी अभ्यास करुन शासनास अहवाल सादर करण्यासाठी विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने उचित निर्णय घेण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर छाननी सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

औष्णिक विद्युत केंद्रातील राखेचा उत्सर्जन करण्याकरिता पाण्याचा वापर रोखण्याबाबत

(७) १११९३ (०४-०४-२०१५). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औष्णिक विद्युत केंद्रामधून निघणाऱ्या राखेची विल्हेवाट लावण्याकरिता फार मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या राखेमध्ये पाऱ्याचे अंश असल्यामुळे या पाण्याचा पुनर्वापर करण्याकरीता फार महागडी यंत्रणा अवलांबावी लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इतर राज्यात या राखेच्या विल्हेवाटाकरीता (Dry bottom ash removal system) चा वापर बंधनकारक करण्यात आलेले आहे ते आपल्या राज्यातील औष्णिक विद्युत केंद्रांना बंधनकारक करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, पाण्याचा वापर रोखरण्याकरीता प्रभावी पर्यायी उपाययोजना काय करण्यात येणार आहे वा करण्यात येत आहे?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०९-२०१५) :(१) हे अंशत: खरे आहे.

(२) राखेमध्ये पाऱ्याचा अंश नगण्य स्वरुपाचा असतो. त्यामुळे हे म्हणणे खरे नाही.

(३) ड्राय बॉटम ॲश रिमूव्हल सिस्टिम च्या वापरासंदर्भात निर्देश उपलब्ध नाहीत. कोरड्या राखेच्या विल्हेवाटकरीता नवीन तंत्रज्ञानावर आधारीत यंत्रणा महानिर्मितीच्या नवीन कार्यान्वित संचा मध्ये बसविण्यात आली आहे.

(४) पाण्याचा वापर रोखण्याकरीता पर्यायी उपाययोजना अवलंबविण्यात आलेली आहे. राखेच्या बंधाऱ्यातील पाणी गोळा करुन त्याचा पुर्नवापर संचामध्ये केला जातो तसेच त्याचबरोबर सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा पुर्नवापर राख हाताळण्यासाठी केला जातो.

राज्यातील ग्राहकांचे वीजदर कमी करण्यासाठी कोळसा खाण मिळण्याबाबत

(८) १२५२८ (०४-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील सर्व ग्राहकांचे वीजदर तुलनेत जास्त असून महाराष्ट्रातील व कोळसाखाण मिळाली तर वीजदर युनिट मागे दीड ते दोन रूपयांनी कमी करणे शक्य होईल त्यासाठी कोळसा खाणीच्या वाटपात राज्यातीलच खाण मिळाली असा प्रस्ताव शासनाने केंद्र शासनाला सादर केला असल्याचे दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावाचा शासनाने केंद्र शासनाकडे काय पाठपुरावा केला आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०९-२०१५) :(१) हे खरे आहे.

मा.मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावरुन मा.केंद्रीय ऊर्जा मंत्री यांना दि.२२.१२.२०१४ च्या पत्रान्वये महाराष्ट्रातील बरांज- I,II,III,IV मनोरा दिप व किलोनी या कोळसा खाणी राज्यास वाटप करण्याबाबत विनंती करण्यात आली होती.

(२) केंद्र शासनाच्या कोळसा मंत्रालयाने सुरु केलेल्या कोळसा खाण पुर्नवाटप प्रक्रियेनुसार महानिर्मिती कंपनीने दि.५.२.२०१५ रोजी मे.एम.एस.टी.सी. (भारत सरकारचा उपक्रम) च्या पोर्टलवर कोळसा खाणी मिळण्याबाबत केलेल्या अर्जामध्ये राज्यातील कोळसा खाणीचा प्राधान्याने समावेश करण्यात आला होता.

तसेच या प्रकरणी मा.मंत्री (ऊर्जा) यांचे स्तरावरुन केंद्र शासनाकडे दि.१०.२.२०१५ रोजी पत्र पाठवून पाठपुरावा करण्यात आला होता. त्यानंतर केंद्रीय कोळसा मंत्रालयाकडून महानिर्मिती कंपनीला छत्तीसगड येथील गारे पाल्मा सेक्टर-२ या कोळसा खाणीचे वाटप करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे भवानीनगर कसोदा (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथे १५० आदिवासी कुटूंबांना हुसकावून त्यांची जमीन बळकाविण्याचा प्रयत्न शासकीय अधिका-यांच्या संगनमताने होत असल्याबाबत

(९) १३०९९ (०४-०४-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भवानीनगर कसोदा (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथे गत् ६० वर्षापासून वास्तव्य करीत असलेल्या १५० आदिवासी कुटूंबांना हुसकावून या व्यक्तीच्या जमीन बळकाविण्याचा प्रयत्न शासकीय अधिका-यांच्या संगनमताने चालू आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर प्रकरणी जिल्हाधिकारी यांना भडगाव पेठ ता.भडगाव जि.जळगांव येथील नागरिकांनी अनेक निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार आदिवासींना हुसकावून लावू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०७-०९-२०१५) :(१) (२) (३) व (४) मौजे कासोदा ता.एरंडोल जि.जळगांव येथील गट नं. ५३६ व ५३७ या जमिनीस उपविभागीय अधिकारी, एरंडोल यांनी दि.१७/०१/२०१३ रोजीच्या आदेशान्वये अकृषिक परवानगी दिली होती. परंतु सदर जागेवर काही आदिवासी कुटुंबांची घरकुले अस्तित्वात आहेत. सदर घरकुलांची संख्या ३४ असुन दि.०३/१२/१९९१ च्या शासन निर्णयानुसार पात्र अतिक्रमण लाभार्थ्यांना सदर जागेतुन हुसकावुन लावण्यात येत असल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. सदर जागेवर घरकूले अस्तित्वात असतांना देण्यात आलेल्या अकृषिक परवानगी बाबत चौकशी करुन अहवाल सादर

करण्याबाबत तसेच सदर कुटुंबाच्या सुरक्षिततेची काळजी घेण्याबाबत आवश्यक ती उपाययोजना करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, एरंडोल यांना जिल्हाधिकारी जळगांव यांनी दि.३१/०३/२०१५ रोजीच्या पत्रान्वये सुचना दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दुष्काळाच्या परिणामामुळे धुळे जिल्ह्यात सुमारे तीनशे दुग्ध विकास संस्था बंद होण्याच्या मार्गावर असल्याबाबत

(१०) १६५०३ (०६-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यात पशुधनामुळे शेतकऱ्यांकडून शासकीय व खाजगी डेरीना पुरक म्हणून दुधाचा व्यवसाय केला जात असून सदर कोरडवाहू जमिन आणि सिंचनाच्या पुरेशा सोयी नसल्याने व दुष्काळाच्या परिणामामुळे तेथील सुमारे तीनशे दुग्ध विकास संस्था बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे मे, २०१५ रोजी च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या वतीने दुध व्यवसायासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना आखल्या आहेत,वा येत आहेत

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :(१) धुळे जिल्ह्यातील ४ तालुक्यांमध्ये प्रत्येकी १ या प्रमाणे ४ कृषी पूरक दूध उत्पादक संघ असून त्यापैकी ३ कार्यरत व १ अवसायनात गेला आहे. सदरहू कृषिपूरक दूध उत्पादक संघाशी सलग्न अशा ३६५ नोंदणीकृत प्राथमिक दूध उत्पादक सहकारी संस्था आहेत. या ३६५ प्राथमिक दूध उत्पादक संस्थापैकी ७२ संस्था कार्यरत असून त्यांचे मार्फत दररोज ७१४४ लीटर इतक्या दूधाचे संकलन केले जाते. उर्वरित २९३ संस्था बंद अवस्थेत आहेत. बंद दूध संस्थांच्या कार्यक्षेत्रात खाजगी प्रकल्प धारकांनी संकलन केंद्र कार्यान्वीत केल्यामुळे व या दूध संस्थांकडे दूध संकलन कमी झाल्याने सदर संस्था बंद झाल्या आहेत.

(२) व (३) केंद्र शासनाच्या वतीने दूध व्यावसायिक शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी संघाचे पुनर्वसन योजना, स्वच्छ दूध उत्पादन योजना व राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत वेगवर्धक दुध विकास कार्यक्रम व राष्ट्रीय पुरक प्रथिने अभियान या योजनेअंतर्गत सरकारी दूध संघाना व सभासद दूध संस्थांना अर्थसहाय्य करण्यात येते. तसेच राज्य स्तरावरील जिल्हास्तरीय एकात्मिक दुग्ध विकास कार्यक्रमांतर्गत सवच्छ व दर्जेदार दूध संकलन संस्थाना होण्यासाठी बल्क मिल्क कुलर, मिल्को टेस्टर बसविण्यासाठी संस्थाना ७५ टक्के अनुदान देण्यात येते.

खान्देशाचे वैभव असलेल्या सातपुड्यात अपारंपारिक ऊर्जा निर्मितीला प्रचंड वाव असल्याबाबत

(११) १६५१९ (१०-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खान्देशाचे वैभव असलेल्या सातपुड्यात अपारंपारिक ऊर्जा निर्मितीला प्रचंड वाव असून आगामी ५ वर्षात १४ हजार ४०० मेगावॅट वीज निर्मितीच्या ध्येय पूर्तीसाठी सातपुडयाचा विचार होणे अत्यंत आवश्यक असल्याचे माहे मे २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे

(४) सदर तपशील उपलब्ध नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय, आहेत

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०९-२०१५) :(१) नाही.

(२) ते (४) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील भुमिअभिलेख विभागाच्या कार्यालयात अधिक्षकांपासून शिपाई पदापर्यंत पदे रिक्त असल्याबाबत

(१२) १६५३५ (०६-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील भुमिअभिलेख विभागाच्या कार्यालयात अधिक्षकांपासून शिपाई पदापर्यंत ६४ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे जमिनीची मोजणी, हद्द कायम करणे यासाठी तेथील जमिनधारकांना खूप महिने प्रतिक्षा करावी लागते तसेच जमिनीच्या खरेदी विक्रीच्या वेळी अडचणी व गैरसोयी निर्माण होतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूमिअभिलेख कार्यालयातील रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :(१), (२), (३) व (४) सोलापूर जिल्ह्यात भूमि अभिलेख विभागाच्या कार्यालयात गट-ब, गट-क व गट-ड संवर्गातील एकूण ७३ पदे रिक्त आहेत. जमिन मोजणीच्या संबंधात भूकरमापक यांची ३२ पदे मंजुर असून त्यापैकी २६ पदे

भरलेली आहेत त्यांचेकडून तसेच अन्य कर्मचाऱ्यांकडून दरमहा मोजणीची कामे केली जातात. पुणे विभागातील गट-क पदसमुह ४ (लिपीक-भूकरमापक) मधील १६० पदे व गट-ड (शिपाई) संवर्गातील ६० रिक्त पदे भरणेची कार्यवाही प्रस्तावित आहे.

राज्यात जनावरांना पिसाट कुत्रे चावल्यानंतर त्यासाठी द्यावी लागणारी रेबिज लस पशुचिकित्सालयात उपलब्ध नसल्याबाबत

(१३) १६६३७ (०६-०८-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जनावरांना पिसाट कुत्रे चावल्यानंतर त्यासाठी द्यावी लागणारी रेबिज लस पशुचिकित्सालयात बंद केल्याचे दिनांक २३ एप्रिल २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाळीव जनावर मालकांना आपले जनावर सुरक्षित रहावे असे वाटत असल्याने ते उपचारासाठी खाजगी मेडिकल दुकानातून रेबिजची लस विकत घेत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी जनावर मालकांना पशुचिकित्सालयात रेबिज लस पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अन्न व औषध प्रशासन विभाग, महाराष्ट्र राज्य, यांनी नोंदविलेल्या आक्षेपानुसार पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्थेचा विषाणू लस निर्मिती परवाना सद्यस्थितीत स्थगित आहे. नवीन उतिसंबधित रेबिज लस उत्पादनाकरीता बीएसएल-३ या प्रयोगशाळेची आवश्यकता आहे व त्याचे नकाशे "अन्न व औषध प्रशासन" विभागाकडून मान्यता प्राप्त करुन घेण्यात आलेले आहे. पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्था, येथे उतिसंबंधित रेबिज लस निर्मितीचे संशोधन व विकास विभागांतर्गत कामकाज चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

देवगड (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील मच्छिमारांसाठी आनंदवाडी बंदर येथे जेटी बांधण्याच्या प्रस्तावाला मंजूरी देण्याबाबत

(१४) १६८७१ (०६-०८-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड (जि.सिंधुदुर्ग) येथील मच्छिमारांसाठी आनंदवाडी बंदर येथे जेटी बांधण्याच्या प्रस्तावाला अद्यापपर्यंत मंजूरी देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, मच्छिमारांसाठी स्वतंत्र जेटी नसल्यामुळे त्यांचे फार मोठया प्रमाणावर गैरसोय होत असून मोठया प्रमाणात अर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आनंदवाडी येथील जेटी प्रकल्प मंजूर करुन तातडीने प्रकल्पाचे बांधकाम करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :(१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) स्थानिक गावकऱ्यांच्या विरोधामुळे काम बंद असून गावकऱ्यांच्या सहमतीने सुधारीत आराखडा तयार करण्यात आला आहे. सुधारीत आराखडयानुसार प्रकल्पाच्या अंदाज पत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यामध्ये दुग्धाची टंचाई भासत असल्याबाबत

(१५) १७३०३ (१०-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यामध्ये दुग्ध व्यवसायासाठी आवश्यक असलेले दुध शितकरण केंद्र डबगाईला आली असून या विभागातील दुधाची गरज भागविण्याकरीता जळगाव व नगर जिल्हयातून दुध येत असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या वतीने शेतकऱ्यांना विविध योजनांमधुन दुधाळ जनावरांचे वाटप करून राज्यातील दुधाचे उत्पादन वाढविण्यासाठी प्रोत्साहन दिले असून अशा अनेक योजनांमधुन प्रत्यक्षात राज्याचे दुधाचे उत्पादन किती वाढवले यांचे संशोधन करण्याची गरज असून याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात आली नसल्याने वरील विभागात दुधाची टंचाई भासत असल्याने यावर शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) : (१) हे खरे नाही.

चिखली तालुक्यात एकूण ४६२९२ लिटर दुधाचे दैनंदिन उत्पादन होत असून सदर दुधाचा पुरवठा स्थानिक हॉटेल व घरगुती वापराकरीता होत असून शासनाचे शितकरण केंद्र चिखली येथे जिल्हा संघामार्फत दैनंदिन सरासरी २००० लिटर दूध चिखली व आजुबाजूच्या परिसरातून संकलित होते. शासनाचे चिखली शितकरण केंद्र सद्य:स्थितीत कार्यान्वित आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

शेतकऱ्याला नुकसान भरपाई भारतीय टेलीग्राफ कायदा १८८५ चा चुकीचा आधार घेऊन दिली जात असल्याबाबत

(१६) १७३०८ (१०-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्चदाब विद्युत शेतकरी केंद्र व राज्य शासनाच्या उर्जा मंत्रालयाच्या विरोधात व भूसंपादनाच्या न्याय मोबदल्यासाठी मुंबई येथील आझाद मैदानावर उपोषणाला बसणार असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्याला जी नुकसान भरपाई दिली जाते ती भारतीय टेलीग्राफ कायदा १८८५ चा चुकीचा आधार घेऊन दिली आहे ही नुकसान भरपाई तुटपुंजी असल्याने संबंधित शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासन चौकशी करणार आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०९-२०१५) :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अति उच्चदाब मनोरा/वाहिनी उभारताना उभ्या पिकांच्या/फळझाडांच्या/ इतर झाडांच्या नुकसानीचा मोबदला भारतीय टेलीग्राफ कायदा, १८८५ मधील तरतुदींप्रमाणे दिला जातो. तसेच शासन निर्णय क्र.संकीर्ण-०२१०/प्र.क्र.२९/ऊर्जा-४ दिनांक ०१.११.२०१० अनुसार मनोऱ्याने व्याप्त केलेल्या जमिनीचाही मोबदला दिला जातो. तथापि, मनोऱ्याने व्याप्त जमिनीचा मोबदला व वाहिनीच्या पट्टयाखालील जमिनीचा मोबदला देण्याबाबतचे सुधारित धोरण केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विद्युत खांबावर दुरुस्तीचे काम करत असताना हातात असलेल्या आर्थिंग रोडचा स्फोट होऊन एक कामगार ठार झाल्याबाबत

(१७) १७३७४ (०६-०८-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)खडपोली(ता.चिपळून, जि. रत्नागिरी) एमआयडीसी परिसरात विद्युत खांबावर दुरुस्तीचे काम करत असताना हातात असलेल्या आर्थिंग रोडचा स्फोट होऊन एक कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती मृत झालेल्या कामगारांच्या कुटूंबियास शासनाने मदत करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०९-२०१५) :(१) दि.१७.४.२०१५ रोजी एक कामगार महापारेषण कंपनीच्या टॉवर लोकेशन क्र.४३ वर बंद असलेल्या २२० के.व्ही.पेडांबे -तांबाटी वाहिनीला आर्थिंग करण्याकरीता चढत असताना त्यांच्या हातातील अर्थरॉड चालू स्थितीत असणाऱ्या २२० के.व्ही. पेडांबे - महाड वाहिनीच्या संपर्कात आल्याने प्राणघातक विद्युत अपघात झाला.

(२) होय.

(३) मृत कामगारांच्या कुटुंबियास संबंधित ठेकेदारांकडून रु. ५ लाख रक्कमेची मदत देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील कोळसा टंचाईमुळे महानिर्मितीने कोराडी, भुसावळ, चंद्रपुर व परळी हे संच बंद करण्याबाबत

(१८) १८२७० (१०-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कोळसा टंचाईमुळे महानिर्मितीने कोराडी, भुसावळ, चंद्रपुर व परळी येथील चार संच बंद करण्यासाठी वीज नियामक आयोगाकडे परवानगी मागितली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईन खान वाटपात महाजनकोने सहभाग न नोंदविल्यामुळे चंद्रपुर जिल्ह्यातील बराज येथील खान महाजनको ऐवजी कर्नाटकच्या के.पी.सी.एल.ला.वितरीत करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आलेली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार राज्यातील महानिर्मितीच्या वीज केंद्रामधील कोळसा टंचाई दुर करण्यासाठी शासनामार्फत कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२३-०९-२०१५) :(१) हे खरे आहे,

(२) हे खरे नाही,

महानिर्मिती कंपनीने दि.५.२.२०१५ रोजी मे.एम.एस.टी.सी. च्या पोर्टलवर कोळसा खाणी मिळण्याबाबत केलेल्या अर्जामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील बरांज कोळसा खाणीचाही समावेश केला होता. तथापि, ती खाण कर्नाटकच्या के.पी.सी.एल. ला वितरित करण्यात आली.

(३) व (४) राज्यातील औष्णिक वीज केंद्राना होणाऱ्या कोळसा पुरवठ्याच्या समस्येबाबत दिनांक ४.११.२०१४ व १२.२.२०१५ रोजी मा.मुख्यमंत्री व मा.केंद्रीय कोळसा व ऊर्जा राज्यमंत्री यांच्या समवेत झालेल्या बैठकीमध्ये त्यांनी दिलेल्या निर्देशानुसार महानिर्मिती कंपनीला कोळसा कंपन्यांकडून प्राप्त होणाऱ्या कोळशाच्या पुरवठ्यामध्ये वाढ झाली त्यामुळे महानिर्मितीच्या शिल्लक कोळसा साठ्यात सुधारणा झाली आहे. याखेरीज वीज केंद्राना रस्तावाहतुकीद्वारे तातडीने कोळसा प्राप्त होण्यासाठी विविध कोळसा कंपन्यांसोबत सामंजस्य करार केल्यामुळे त्याद्वारेदेखील कोळसा पुरवठा सुरु झाला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील गोरेगांव येथील आरे डेअरीचे खाजगीकरण करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

(१९) १८२८९ (०६-०८-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगांव येथील आरे व दुग्धविकास विभागाला साडेचार हजार कोटी रुपयाचा तोटा आल्याचे कारण देवून आरे डेअरीचे खाजगीकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरेची एनर्जी, तूप, दूध यासह दुग्धजन्य पदार्थांचे खाजगीकरण करुन शासकीय, खाजगी सहभाग (पीपीपी) या नावाखाली आरे या ब्रँड संपवून टाकण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर मान्यतेसाठी सादर करण्यांत येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीअंती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, आरेचे खाजगीकरण न करण्याच्या दृष्टीने शासन काय उपाययोजना करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) बंद पडलेल्या अथवा बंद पडण्याची शक्यता असणाऱ्या दुग्धशाळा व शितकरण केंद्रांची पीपीपी प्रक्रियेमार्फत पुनरुज्जीवीत करणे ही बाब विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राजिवडा (जि.रत्नागिरी) येथील पडझड झालेल्या शाळा इमारतीची दुरूस्ती करण्याबाबत

(२०) १८३९३ (१०-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजिवाडा व साखरीनाटे (ता.राजापूर. जि.रत्नागिरी) या ठिकाणी शासकिय मस्त्योद्योग विभागाच्या मच्छिमार मुलांच्या शाळा सुरु करण्यात आल्या आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास,या शाळेच्या इमारतीची पडझड झाली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास,या शाळेची इमारत दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :(१) होय,
तथापि, सदर शाळा या विभागाच्या दिनांक २०/२/२००२ अन्वये जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आल्या आहेत.
(२) नाही,
(३) राजिवडा व साखरीनाटे, जि.रत्नागिरी येथील शाळेच्या इमारतीची पडझड झालेली नसून, राजिवडा (जि.रत्नागिरी) येथील शाळेच्या इमारतीमधील एका वर्गाच्या भिंतीला तडा गेला आहे. सदर भितींच्या दुरुस्तीबाबत शाळेने सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा परिषद यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

खारलॅण्ड बंधाऱ्याच्या माध्यमातून ऊर्जानिर्मिती करण्यासाठी रत्नागिरी तालुक्यातील गावडे आंबेरे व चाफेरी कासारी या गावांतील बंधाऱ्याची निवड करण्याबाबत

(२१) १८४१७ (१०-०६-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारलॅण्ड बंधाऱ्याच्या माध्यमातून ऊर्जानिर्मिती करण्यासाठी रत्नागिरी तालुक्यातील गावडे आंबेरे व चाफेरी कासारी या गावांतील बंधाऱ्याची निवड करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिवसातून प्रत्येकी दोनवेळा होणाऱ्या भरती-ओहोटीतून ४ किलोवॅट ऊर्जा या बंधाऱ्यांतून तयार होवू शकते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पाची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, जिल्ह्यातील अन्य बंधाऱ्यांच्या ठिकाणी असे ऊर्जा निर्मितीचे रपकल्प राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०९-२०१५) :(१) नाही.
(२) ते (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्याच्या मासेमारी क्षेत्रामध्ये मोठमोठ्या पर्सिसनेट नौका मासेमारी करीत असल्याबाबत

(२२) १८४२४ (१०-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या मासेमारी क्षेत्रामध्ये म्हणजेच १२ नॉटिकल्स माईल्सच्या आत बाहेरील राज्यातील २०० ते ४०० अश्वशक्तीचे इंजिन असलेल्या मोठमोठ्या पर्सिसनेट नौका जमावाने येवून मासेमारी करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे राज्यातील मध्यम आकाराच्या यांत्रिक नौकांना मासेमारी करण्यासाठी पुरेसा मच्छीसाठा या क्षेत्रामध्ये शिल्लक राहत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, घुसखोरी करुन राज्यातील मच्छमारी नौकांवर हल्ले करणाऱ्या बाहेरील राज्यातील नौकांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे ,
(४) असल्यास, १२ नॉटिकल ऐवजी २४ नॉटिकलपर्यंत मासेमारी करण्याची परवानगी देण्यात यावी, अशी मागणी कोकणातील गुहागार तालुका मच्छीमार संघटनेने मत्स्यव्यवसाय आयुक्तांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :(१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) राज्याचे जलधी क्षेत्रात अवैध मासेमारी करणाऱ्या नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अंतर्गत दंडात्मक कार्यवाही करण्यात येते.

(४) होय.
(५) २४ नॉटिकल माईल्स वाढविण्याची बाब केंद्र शासनाच्या अखत्यारित येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

कर्नाटक तसेच शेजारच्या राज्यातील मच्छिमार अत्याधुनिक बोट, जाळी व यंत्र सामुग्रीच्या सहाय्याने महाराष्ट्राच्या सागरी हद्दीत येवून मच्छिमारी करीत असल्याबाबत

(२३) १८९०३ (०६-०८-२०१५). श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्नाटक तसेच शेजारच्या राज्यातील मच्छिमार लोक स्पीडबोट आणि अत्याधुनिक जाळी तसेच यंत्र सामुग्रीच्या साहयाने महाराष्ट्राच्या सागरी हद्दीत येवून मच्छिमारी करीत असल्याने स्थानिक मच्छिमारांवर उपासमारीची वेळ आली असल्याबाबतचे निवेदन मुरुड येथील सागरकन्या मच्छिमार संघाच्यावतीने शासनाला निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, परप्रांतीय मच्छिमारांकडून स्थानिक मच्छिमारांवर होत असलेला अन्याय दूर करण्याचे दृष्टीने शासन कोणती ठोस उपाययोजना करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :(१) होय,
(२) व (३) महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ कायद्याच्या अंमलबजावणीसाठी गस्ती नौका कार्यान्वयित करुन बेकायदेशीर मासेमारी नौकांविरुध्द कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाला बाजारभाव व अंगवणवाडीमध्ये सुगंधी दुध पावडर देण्याबाबत

(२४) १९२९६ (१०-०८-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने शेतकऱ्याकडून दुध खरेदी करताना दुध संघाने रु. २० पेक्षा कमी दराने खरेदी करु नये असे आदेश मा.दुग्धविकास मंत्री यांनी दिनांक २६ मे, २०१५ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुध खरेदी आणि विक्री करताना राज्य शासनाचे आदेश न मानणाऱ्या दुध संघाविरुध्द कारवाई करुन संचालक मंडळ बरखास्त करण्याची कारवाई करण्यात येईल असे मा.दुग्ध विकास मंत्री यांनी जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील अतिरिक्त दुधाचा वापर एकात्मिक बालविकास प्रकल्पांर्गत अंगणवाड्यांमध्ये टेट्रा पंकच्या माध्यमातून सुगंधी दुध देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील अतिरिक्त दुधाचा भुकटी करुन तीचा वापर शालेय पोषण आहारात आठवड्यातून एक दिवस करण्याबाबत शासन स्तरावर कुठली कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) असल्यास, राज्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांना दुधाला रु. २५/- प्रति लिटर बाजारभाव देण्याबाबत व अंगवणवाडीमध्ये सुगंधी दुध शालेया पोषण आहारात दुध पावडर देण्याबाबत शासन स्तरावर कुठली कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :(१) होय.
(२) राज्यातील दूध उत्पादक सहकारी संघांनी दूध उत्पादक शेतकऱ्यांचे दूध शासनाच्या रु.२०/- प्रतिलिटर या दराने खरेदी करावे असे आवाहन करण्यात आले होते व त्याप्रमाणे कार्यवाही न करणाऱ्या सहकारी संघांवर कारवाई करण्यात येईल असे सूचित करण्यात आले होते, हे खरे आहे.
(३), (४) व (५) दूध भुकटी व सुगंधीत दुधाचा उपयोग शालेय पोषण आहारात करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताकरीता दि.१६ डिसेंबर,२०१४ रोजी नागपूर विधीमंडळ अधिवेशन काळात मा.मुख्यमंत्री व मा.विधानसभा अध्यक्ष यांच्या समवेत संबंधित लोकप्रतिनिधींच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सहकारी संघांकडे अतिरिक्त स्वरुपात संकलित होणारे दूध तोटा सहन करुन शासन शासकीय दूध खरेदी दराने स्विकारीत आहे. शासनाचे दूध खरेदी दर रु.२०/- अधिक रु.२.५० वरकड खर्च असे मिळून रु.२२.५० प्रतिलिटर असे आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

महानंदा दुध डेअरी मधील शेकडो कोटी रुपयांच्या
घोटाळेबाजांवर कठोर कारवाई करण्याबाबत

(२५) १९३०८ (०६-०८-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानंदा दुध डेअरी मधील शेकडो कोटी रुपयांच्या केलेल्या घोटाळ्याच्या चौकशीच्या मागणीच्या अनुषंगाने मा. दुग्ध विकासमंत्री महोदयांनी याप्रकरणी सखोल चौकशी करुन घोटाळे करणाऱ्यावर कडक कारवाई करण्याचे आश्वासन माहे एप्रिल २०१५ मध्ये दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीअंती घोटाळे करणाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :(१) व (२) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या. महानंद गोरेगाव (पूर्व) यांचे सन २००९-१० व सन २०१०-११ या कालावधीच्या लेखापरीक्षणामधील आक्षेपांबाबत सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अंतर्गत चौकशी करण्याचे आदेश दि. ०५/०१/२०१५ रोजी निर्गमित केले आहेत.

तसेच महासंघाच्या कामकाजाबाबत सन २००९-१०, २०१०-११, २०१२-१३, २०१३ - १४ या वर्षांचा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल, उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), पुणे यांचा दि.३०/०८/२०१४ चा अहवाल व व्यवस्थापकीय संचालक, महानंद यांचे दि.१९/०१/२०१५ चे पत्र यांचा एकत्रीत विचार करण्यात येवून महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ अन्वये विद्यमान संचालक मंडळास अनियमितते बाबत बरखास्तीची नोटीस सहनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) यांनी दि. २४/०३/२०१५ रोजी बजावली आहे.

(३) सद्य:स्थितीत चौकशीची प्रक्रिया सुरु असून विलंब झालेला नाही.

मालवण (जि.सिंधुदुर्ग) समुद्रात किना-यालगत गोवा तसेच रत्नागिरी येथे पर्सनेट ट्रॉलर्स पकडण्यात आल्याबाबत

(२६) १९५१० (१०-०८-२०१५). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) समुद्रात किना-यालगत चार वाव खोल पाण्यात मासळीची लुट करणा-या गोवा तसेच रत्नागिरी येथे पर्सनेट ट्रॉलर्स दिनांक ६ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास पकडण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पकडण्यात आलेले ट्रॉलर्स गोवा येथील असल्याची माहिती सर्वत्र पसरल्यामुळे मासे वाहतूक करणा-या मालवणातील मत्स्य व्यावसायिकांच्या गाड्या गोवा हद्दीत अडविण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंधुदुर्ग किनारपट्टीवर पर्सनेट पारंपरिक मच्छिमार यांच्यात झालेल्या संघर्षबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, ,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१८-०९-२०१५) :(१) होय.
(२) होय.
(३) कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या नौकांची तपासणी करुन त्यांचेवर महाराष्ट्र सागरी मासेमारी अधिनियम, १९८१ अंतर्गत अभिनिर्णय अधिकारी यांचेकडे प्रतिवेदने दाखल करण्यात आली आहेत. तसेच सडगांव येथे गोव्याचे मंत्री, लोकप्रतिनिधी व सिंधुदूर्ग जिल्हयातील मच्छिमार यांच्यामध्ये सामंजस्य तोडगा काढून सिंधुदूर्ग जिल्हयातील मासळी, गोवा येथील बाजारपेठेत घेण्यास पूर्ववत सुरुवात करण्यात आली आहे.
(४) गस्तीनौकेद्वारे अंमलबजावणी अधिकारी यांनी सागरी जलधी क्षेत्रात नियमबाह्य मासेमारी करणाऱ्या मासेमारी नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अंतर्गत अभिनिर्णय अधिकारी यांचेकडे प्रतिवेदने दाखल करुन या मालकावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

ता.लोणार जि.बुलढाण येथील स्थानिक सरोवर काठावर असलेल्या पशुवैद्यकिय दवाखान्याची अत्यंत दुरावस्था झाल्याबाबत

(२७) १९७६९ (१०-०८-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)ता.लोणार जि.बुलढाणा स्थानिक येथील सरोवर काठावर असलेल्या पशुवैद्कीय दवाखान्याची अत्यंत दुरावस्था झाली असून उपचारांकरीता येणा-या मुक्या जनावरांची अवहेलना होत असल्याचे माहे मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दवाखान्याच्या दुरूस्तीबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :(१) हे खरे नाही. पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ लोणार, तालुका-लोणार, जिल्हा-बुलढाणा, येथील दवाखाना सरोवर काठावर आहे. सदर दवाखाना नवीन असून इमारत सुस्थितीत आहे. तसेच उपचाराकरिता येणाऱ्या मुक्या जनावरांची अवहेलना होत नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य दूध उत्पादन संघामध्ये (महानंद) सन २००९ ते २०१४ या कालावधीत मोठया प्रमाणात झालेला गैरव्यवहार

(२८) २०५७२ (०६-०८-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अर्जुन खोतकर (जालना) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य दूध उत्पादन संघामध्ये (महानंद) सन २००९ ते २०१४ या कालावधीत मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे लेखापरिक्षणातून निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कालावधीत झालेल्या आर्थिक गैरव्यवहार आणि संचालकांनी केलेल्या उधळपटटीची सहकार कायद्याच्या कलम ८३ अन्वये चौकशी करण्यासाठी विशेष अधिकारी म्हणून विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) श्री. दिग्विजय राठोड यांनी नियुक्ती केली आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबंधित दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे,वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :(१) हे खरे आहे.
(२) सन २००९-१० व सन २०१०-११ या कालावधीच्या लेखापरीक्षण अहवालातील आक्षेपांबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशी करण्यासाठी सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), मुंबई यांनी दि.०५/०१/२०१५ आदेशान्वये श्री.दिग्विजय राठोड यांची नियुक्ती केली होती. तथापि,, श्री.राठोड यांनी चौकशी करण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) त्यांच्या जागी श्रीमती मिना आहेर, विभागीय उपनिबंधक, मुंबई विभाग यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(३) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या. मुंबई यांच्या सन २००९-१० व २०१०-११ या कालावधीच्या लेखापरीक्षणामधील आक्षेपांबाबत सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अंतर्गत चौकशी करण्याचे आदेश दि.०५/०१/२०१५ रोजी निर्गमित केले आहेत.

तसेच महासंघाच्या कामकाजाबाबत सन २००९-१०, २०१०-११, २०१२-१३, २०१३ - १४ या वर्षांचा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल, उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), पुणे यांचा दि.३०/०८/२०१४ चा अहवाल व व्यवस्थापकीय संचालक, महानंद यांचे दि.१९/०१/२०१५ चे पत्र यांचा एकत्रीत विचार करण्यात येवून महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ अन्वये विद्यमान संचालक मंडळास अनियमितते बाबत बरखास्तीची नोटीस सहनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) यांनी दि. २४/०३/२०१५ रोजी बजावली आहे.
(४) या प्रकरणी सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांनी दि.०५/०१/२०१५ व दि.२४/०३/२०१५ रोजी चौकशी करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. सद्य:स्थितीत चौकशीची प्रक्रिया सुरु असून विलंब झालेला नाही.

आरे कॉलनी, गोरेगांव, मुंबई येथील म्हशींच्या तबेले धारकांकडून
अन्यायकारक वसूली होत असल्याबाबत

(२९) २०६३२ (१०-०८-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरे कॉलनी, गोरेगांव, मुंबई येथील म्हशींच्या तबेलेधारकांकडून अनधिकृत पणे वसूली होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.दुग्धविकास मंत्री, यांना एक लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ,
(३) अद्याप, कारवाई झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :(१) हे खरे आहे.
(२) मा.लोकप्रतिनिधी यांनी निवेदन देण्यापूर्वी शासनाकडे दि.२२/०१/२०१५ रोजी आरे दुग्ध वसाहतीमधील परवाने धारकाकडील वीज आकार, पाणी आकार व परवाना शुल्काच्या थकबाकीबाबत परवाने धारकांसोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये परवाने धारकांनी विज आकार, पाणी आकार व परवाना शुल्काच्या थकबाकी संपूर्ण रक्कम दिनांक ३१/०३/२०१५ पूर्वी भरणा करावी, पूर्ण थकबाकी भरल्यानंतरच वादातील दंड व व्याजाच्या रक्कमेबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला होता. तथापि, सदर निर्णयानुसार परवाने धारकांनी थकबाकीच्या संपूर्ण रक्कमेचा भरणा केला नाही. दि.०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५ या वित्तीय वर्षामध्ये दि.३१/०३/२०१५ ते अखेर परवाना शुल्क, विज आकार व पाणी आकारापोटी रु.९,३८,२१,२३८/- एवढी थकबाकी होती. त्यापैकी दि.३१/०३/२०१५ अखेर पर्यंत ८,३९,५४,८५१/- इतकी थकबाकी वसूल करण्यात आली असून दि.३१/०३/२०१५ अखेर रु. ९८,६६,३८७/- इतकी रक्कम परवाने धारकांकडून अद्याप येणे बाकी आहे.

तसेच दि. ३१/०३/२०१५ अखेर विज आकार, पाणी आकार, परवाना शुल्काबाबत, वरील प्रमाणे दर्शविलेली रक्कम तसेच पॅराग्रास क्षेत्र आकार, दंड व व्याज मिळून सर्व अशी एकूण ८,७५,७७,१६८/- इतकी रक्कम परवाने धारकाकडे थकीत आहे. परवाने धारकांनी त्यांच्याकडे असलेल्या थकबाकीच्या रक्कमेचा संपूर्ण भरणा केला नसल्यामुळे व्याज व दंडाबाबतच्या वादातील रक्कमेबाबत निर्णय झालेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

ता.रावेर (जि.जळगाव) येथे सौर उर्जा प्रकल्प उभारण्याबाबत

(३०) २१५२४ (०६-०८-२०१५). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ता.रावेर, जि.जळगाव येथे सौर उर्जा प्रकल्प उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व मा.उर्जा मंत्री यांचेकडे माहे मार्च, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०७-०९-२०१५) :(१) होय.

(२) ता.रावेर, जि.जळगांव येथे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व मा.ऊर्जा मंत्री यांनी केलेले निवेदन पुढील कार्यवाहीसाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पुणे या शासनाच्या पथदर्शी संस्थेकडे पाठविण्यात आले आहे. तसेच शासनाने दिनांक २० जुलै,२०१५ रोजी अपारंपारिक ऊर्जा धारेण-२०१५, जाहीर केले आहे. त्यात सौर ऊर्जा प्रकल्पांच्या विषयाचा समावेश आहे.

(३) लागू नाही.

दिपनगर (जि.जळगाव) येथील औष्णिक विद्युत प्रकल्पातील
संच क्र. १ व २ बंद असल्याबाबत

(३१) २१५३४ (१०-०८-२०१५). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिपनगर (जि.जळगाव) येथील औष्णिक विद्युत प्रकल्पातील २१० मे.वॅट विद्युत निर्मिती क्र. १ व २ हे गत ४ महिन्यापासून बंद असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने सदर संच सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०९-२०१५) :(१) दिपगनर, भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे २१० मे.वॅ. क्षमतेचे संच क्र.२ व ३ आहेत. कोळशाच्या कमतरतेमुळे संच क्र.२ महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मंजूरीनुसार इकॉनामीक शट डाऊन अंतर्गत दि.१३ सप्टेंबर,२०१४ ते दि. ४ जुलै २०१५ पर्यंत बंद होता. सद्यस्थिती सदर संचाची वार्षिक देखभाल सुरु असल्यामुळे बंद आहे.

संच क्र. ३ दि. २० एप्रिल, २०१५ ते दि. १२ जून २०१५ या कालावधीत भार प्रेषण केंद्राकडून वीजनिर्मिती निर्धारण न मिळाल्यामुळे बंद होता.

(२) व (३) भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र संच क्र.२ चे वार्षिक देखभालीचे काम सुरु असून संच क्र.३ कार्यान्वित केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गोरेगांव येथील डेअरी सायन्स इन्स्टिटयूट या संस्थेकडे
शासनाने दुर्लक्ष केल्याबाबत

(३२) २१६८४ (०६-०८-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगांव येथील डेअरी सायन्स इन्स्टिटयूट या संस्थेकडे शासनाने दुर्लक्ष केल्याने अनेक यंत्रे दुरुस्ती आणि देखभाली अभावी बंद असल्याने विदयार्थ्यांना फक्त पुस्तकी प्रशिक्षण मिळत असून प्रशिक्षणासाठी महानंद डेअरीत नेले जाते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डेअरी सायन्स इन्स्टिटयूट बचाव कृती समितीने मा. मुख्यमंत्र्यांना २०८ विदयार्थ्यांच्या सहीचे निवेदन माहे फेब्रुवारी २०१५ दरम्यान दिले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बाब १ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, कार्यवाहीस होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :(१) हे खरे नाही. सदर संस्थेतील अभियांत्रिकी, दुग्धतंत्रशास्त्र तसेच रसायन व अणुजीव प्रयोग शाळेतील उपलब्ध साधन सामग्रीचा वापर करुन विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिके करुन घेतली जातात.
(२) डेअरी सायन्स इंस्टीट्युट बचाव कृती समितीने निवेदन सादर केले नसून सदर संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांतर्फे मा.मुख्यमंत्र्यांना दि.०१/०२/२०१५ च्या पत्रान्वये निवेदन दिले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

भुसावळ तालुक्यातील विस्तारित दिपनगर वीजनिर्मिती प्रकल्पाला पर्यावरणीय मान्यता देताना केंद्रिय पर्यावरण विभागाने रेन वॉटर हार्वेस्टींग चा निकष लावला असल्याबाबत

(३३) २१६८७ (०६-०८-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ तालुक्यातील विस्तारित दिपनगर वीजनिर्मिती प्रकल्पाला पर्यावरणीय मान्यता देताना केंद्रिय पर्यावरण विभागाने रेन वॉटर हार्वेस्टींग चा निकष लावला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पातून व्यावसायिक वीजनिर्मितीला सुरुवात होवून दोन वर्षे झाली तरीही निकषाची पूर्तता झालेला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, भाग १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने औष्णिक केंद्राने रेन वॉटर हार्वेस्टींगसाठी असलेला निधी अद्याप खर्च न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(५) असल्यास, रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा केली आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०९-२०१५) :(१) हे खरे आहे.
(२) दिपनगर वीज निर्मिती प्रकल्पाचे काम जानेवारी,२०१४ मध्ये पूर्ण झाले असून त्यानंतर रेन वॉटर हार्वेस्टीगचे काम, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची मान्यता मिळाल्यानंतर, माहे मार्च, २०१५ पासून सुरु करण्यात आले. सद्यस्थितीत सदरचे काम ७० टक्के पूर्ण झाले असून उर्वरित काम लवकरच पूर्ण करुन ते कार्यान्वित होईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) रेन वॉटर हार्वेस्टींगसाठी असलेला निधी पूर्णत: खर्च करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात सर्वत्र मोठया प्रमाणात पवनऊर्जा प्रकल्पांनी प्रकल्पावर देखरेख करण्याकरीता नियुक्ती केलेल्या वॉचमनला कमी वेतन देऊन फसवणूक केल्याबाबत

(३४) २१८८४ (१०-०८-२०१५). श्री.शंभूराज देसाई (पाटण) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सर्वत्र मोठया प्रमाणात पवनऊर्जा प्रकल्पांनी आपआपले प्रकल्प उभारले असून या प्रकल्पावर देखरेख करण्याकरीता वॉचमनच्या नियुक्ती केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विविध पवनऊर्जा प्रकल्प कंपन्यांनी देखरेख करण्याकरिता नेमलेले वॉचमन यांची नोंद सहाय्यक कामगार आयुक्त यांच्या कार्यालयाकडे न करता खासगी स्वरुपात मजूरीवर वॉचमन भरलेले असून या वॉचमनना कामगार मंडळाने ठरवून दिलेले ७५००/- रुपये वेतन या कंपन्या न देता २०००/- ते २५०० रुपये वेतन देवून वॉचमननांची फसवणूक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पवनऊर्जा कंपन्यांनी उभारलेल्या पवनचक्क्यांची व त्यांच्या देखरेखी करीता ठेवलेल्या वॉचमनांची नोंद सहाय्यक कामगार आयुक्त यांच्या कार्यालयाकडे करणे गरजेचे असताना ती केली नसून वॉचमनचर दबाव टाकून त्यांना केवळ राबवून घेण्याचे काम या कंपन्या करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य शासनाने यासंबंधी चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांनवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०८-०९-२०१५) :(१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) ते (६) महाराष्ट्र खाजगी सुरक्षारक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ अंतर्गत अंमलबजावणी दि.२७.२.२००९ पासून एकूण १५ जिल्हा क्षेत्रांसाठी लागू करण्याबाबत

निदेश कामगार विभागामार्फत देण्यात आल्याची अधिसूचना जारी करण्यात आली आहे. तसेच, अंतिम अधिसूचना क्र.सिजीओ/१५०८/प्र.क्र.१२३६/काम-५, दिनांक २१.२.२०१२ रोजी जारी करण्यात आली आहे. त्यान्वये जिल्हा स्तरावर जिल्हा सुरक्षा मंडळ सुरु करुन त्याअंतर्गत शासकीय-निमशासकीय आस्थापनांना उक्त अधिनियमाच्या तरतूदीचे अनुपालन करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. कामगार निरीक्षकांनी निरीक्षणे केली असून, पुणे विभागात दोन आस्थापनांविरुध्द फौजदारी खटले दाखल केलेले आहेत. तसेच संबंधित कामगारांना आर्थिक लाभ मिळवून दिला आहे. उर्वरीत आस्थापना मालकांविरुध्द कायदेशीर कारवाई सुरु आहे.

उच्चदाबाच्या वीज मनो-याने व्याप्त जमिनीचा वाढीव मोबदला व अकृषक जमिनीबाबतीत वाहिनीच्या क्षेत्राखालील बाधित जमिनीबद्दल एफ.एस.आय. देण्याबाबत

(३५) २२०६४ (०६-०८-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्चदाबाच्या वीज मनो-याने व्याप्त जमिनीचा वाढीव मोबदला व अकृषक जमिनीबाबतीत वाहिनीच्या क्षेत्राखालील बाधित जमिनीबद्दल एफ.एस.आय. देण्याबाबतचा सुधारीत प्रस्ताव शासनाकडे पाठविला असल्याचे मा.ऊर्जा मंत्री यांनी दि.२८.०८.२०१३ चे कपासू-२०१३ / प्र.क्र.२२६/ ऊर्जा -४ अन्वये स्थानिक लोकप्रतिनिधी चंद्रपूर यांना कळविले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज मनो-याच्या उभारणी मुळे शेतजमिनीचा बाजर मुल्य कमी होता आणि वाहिनीच्या क्षेत्राखालील पीकांच्या लागवडीला मर्यादा येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उच्चदाबाच्या वीज मनो-याने व्याप्त जमिनीचा वाढीव मोबदला व अकृषक जमिनीबाबतीत वाहिनीच्या क्षेत्राखालील बाधित जमिनीबद्दल एफ.एस.आय संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) तसेच विद्युत कायदा २००३ मध्ये मनो-याने व्यापलेल्या जमिनीचे मासिक व इतर प्रकारे भाडे देण्यासंदर्भात तरतूद करणे शासनाच्या विचाराधीन आहे काय?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०९-२०१५) :(१) हे खरे आहे,

(२) हे खरे नाही,

मनोऱ्याच्या पायथ्याचा भाग वगळता इतर भागात शेतकरी पिके घेऊ शकतात.

(३) मनोऱ्याने व्याप्त जमिनीचा मोबदला व वाहिनीच्या पट्टयाखालील जमिनीचा मोबदला देण्यासंबंधीचे सुधारीत धोरण केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महानिर्मिती कंपनीने कोल वॉशरीज च्या रिजेक्ट कोल वर चालणारे वीज निर्मिती प्रकल्प चंद्रपूर येथे उभारण्याबाबत

(३६) २२१५८ (०६-०८-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानिर्मिती कंपनीने कोल वॉशरीज व कोल वॉशरीज च्या रिजेक्ट कोल वर चालणारे वीज निर्मिती प्रकल्प चंद्रपूर येथे उभारण्यासाठी मे.डेझिन प्रा.लि., नवी दिल्ली यांची नियुक्ती केली असल्याचे लेखी उत्तर दिनांक ११/०९/२०१४ च्या क्र.कपासू २०१४/ प्र.क्र.२५३/ ऊर्जा- ४ अन्वये मा.ऊर्जा मंत्री यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी चंद्रपूर यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रातील संच क्र.१ व २ हे कालबाह्य झाले असल्यामुळे सदर संचांचे नुतनीकरण व आधुनिकीकरण करण्यासाठी डिझाईन कन्सल्टंट नेमण्यात आले असल्याचे मा.ऊर्जा मंत्री यांनी कपासू-२०१४/ प्र.क्र.२५२/ ऊर्जा-४ अन्वये यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी चंद्रपूर यांना कळविले आहे, हे ही खरे अाहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रात कोल वॉशरी उभारण्यासंदर्भात व संच १ व २ चे नुतनीकरण / आधुनिकीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, होणाऱ्या विलंबाचे कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०९-२०१५) :(१) तत्कालिन मा.ऊर्जा मंत्री यांनी त्याप्रमाणे स्थानिक लोकप्रतिनिधींना कळविले आहे, हे खरे आहे.

(२) तत्कालिन मा.ऊर्जा मंत्री यांनी त्याप्रमाणे स्थानिक लोकप्रतिनिधींना दि.१२.९.२०१४ च्या पत्राने कळविले हे खरे आहे.

(३) व (४) चंद्रपूर औष्णिक वीज केंद्रात कोल वॉशरीज उभारण्यासंदर्भात संबंधित तांत्रिक सल्लागाराकडून विस्तृत प्रकल्प अहवाल प्राप्त झाला आहे. तथापि, सदर अहवालात बऱ्याच त्रुटी असल्याने, अहवाल तांत्रिक सल्लागाराकडे पुनर्विलोकनासाठी पाठविण्याचे विचाराधीन आहे.

कोराडी संच क्र.६ चे नूतणीकरण व आधुनिकीकरणाची कार्यवाही सुरु असून सदर संचाचे नूतनीकरण व आधुनिकीकरण पुर्ण झाल्यानंतर आणि सदर संचाच्या कामगिरीचे अवलोकन केल्यानंतरच चंद्रपूर संच क्र.१ व २ चे नूतनीकरण व आधुनिकीकरण करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा) हा स्वायंत संस्थेवर गेल्या पाच वर्षापासून अधिकारी नसल्याबाबत

(३७) २२२४९ (०६-०८-२०१५). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा) हा स्वायंत संस्थेवर गेल्या पाच वर्षापासून अधिकारी नसल्याने अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पांना भूसंपादन, मुलभूत सुविधा, प्रकल्प उभारणीचे ना हरकत प्रमाणपत्र, मंजुरी प्रक्रिया व वीज खरेदी करण्याचे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रलंबित प्रस्तावांमुळे अनेक उद्योजकांनी महाराष्ट्राबाहेर कोट्यावधीची गुंतवणुक करण्याचा इशारा दिल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या प्रलंबित प्रस्तावाबाबत शासनस्तरावरुन कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०७-०९-२०१५) :(१) नाही.

(२) नाही.

(३) राज्यात अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीस चालना देण्याच्या दृष्टीने अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीचे धोरण जाहीर करणेची बाब शासनाच्या विचाराधीन होती. शासनाने शासन निर्णय क्र.अपाऊ -२०१५/प्र.क्र.४९/ऊर्जा-७ दि.२०/७/२०१५ अन्वये नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीचे पारेषण सलग्न प्रकल्पांसाठी एकत्रित धोरण २०१५ जाहीर केले आहे. या धोरणांतर्गत अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांपासून एकूण १४४०० मे.वॅ. क्षमतेचे प्रकल्प आस्थापित करणेचे उद्दिष्ट निश्चित करणेत आले आहे.

(४) लागू नाही.

कोळसा (ता.सेनगांव, जि.हिंगोली) येथील १३२ के.व्ही. उपकेंद्र उभारणीचे काम अर्धवट अवस्थेत असल्याबाबत

(३८) २२६५२ (१०-०८-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळसा (ता.सेनगांव, जि.हिंगोली) येथील १३२ के.व्ही. उपकेंद्र उभारणीचे काम अनेक दिवापासून अर्धवट अवस्थेत असलेले काम पूर्ण करण्यासंदर्भात संबंधीत विभागाकडून अदयापर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर १३२ के.व्ही. उपकेंद्राचे उभारणीचे काम अद्यापही पूर्ण न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास सदर १३२ के.व्ही. उपकेंद्राचे उभारणीचे कम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाकडून काय कार्यवाही करण्यात येत आहे वा आली आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०९-२०१५) :(१) हे खरे नाही,
(२) सदर उपकेंद्र व वाहिनी उभारण्याचे कंत्राट मे.इसीआय व शांघाय या कंपनीस देण्यात आले होते. तथापि, सदर कंपनीच्या कामाची गती समाधान कारक नसल्याने महापारेषण कंपनीतर्फे सदर कंपनीकडून कामाचे कंत्राट काढून घेण्यात आले.
(३) सध्या सदर उपकेंद्र व वाहिनीच्या कामासाठी पुर्ननिविदेची प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

तोतलाडोह जलाशयात (जि.नागपूर) मासेमारी करण्यावर
सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातली असल्याबाबत

(३९) २३०८८ (१०-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तोतलाडोह जलाशयात (जि.नागपूर) मासेमारी करण्यावर सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातली असल्याने रयतवाडी येथील ग्रामस्थांची उपजिविका या मासेमारीवर चालत असल्याने त्यांच्याकरिता कोणती पर्यायी उत्पन्नाचे साधन उपलब्ध करुन दिले नाही हे खरे आहे काय,
(२)असल्यास, त्यामुळे या ग्रामस्थाना लपून मासेमारी करावी लागत आहे हे खरे आहे काय
(३) असल्यास, मच्छिमारांवर गोळीबार करण्याच्या घटना वारंवार घडत असून त्यात नाहक ग्रामस्थांचे बळी जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, माहे फेब्रुवारी २०१५ मध्ये केलेल्या गोळीबारात बबन बनोते यांचा मृत्यू झाल्याप्रकरणी तेथील ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन करुन गोळीबार करणाऱ्यांवर कारवाई करण्याची तसेच मयतांच्या पत्नीला नोकरी देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले त्या अनुषंगान दोषी असणाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, ग्रामस्थांच्या पर्यायी उपजिविकेकरिता शासनामार्फत कोणती पर्यायी व्यवस्था करण्यात आली वा येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :(१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) दि.२३ फेब्रुवारी, २०१५ रोजी तोतलाडोह जलाशयात अवैध मासेमारी करणाऱ्या लोकांनी वन कर्मचाऱ्यांना घेराव घातल्याने वन कर्मचाऱ्यांनी स्वसंरक्षणासाठी हवेत केलेल्या गोळीबारात श्री.हरीनंद सुंदरलाल बनवारी या व्यक्तीचा मुत्यू झालेला आहे.

(५) मुख्य वनसंरक्षक व क्षेत्रसंचालक, पेंच व्याघ्रपक्रल्प, नागपूर यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार प्रस्तुत प्रकरणी पोलिस विभाग व जिल्हाधिकारी नागपूर यांचे कार्यालयामार्फत चौकशी सुरु आहे.
(६) पेंच (१६०५ हेक्टर) या पाटबंधारे विभागाच्या तलावावर रयतवाडी येथील मच्छीमारांना कायमस्वरुपी मासेमारीसाठी परवाने देण्याचा प्रस्ताव दिला असता त्यांनी तो अमान्य केलेला आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे शहरातील पारोळा रोड लगत पशुवैद्यकीय चिकीत्सालयाच्या इमारतीचे काम अपुर्ण असल्याबाबत

(४०) २३१४३ (०६-०८-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील धुळे शहरातील पारोळा रोड लगत पशुवैद्यकीय चिकीत्सालयाच्या इमारतीचे काम १९९५ पासुन आजतागायत अपुर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इमारतीचे अपूर्ण काम असण्याची कारणे काय आहेत,
(३)असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीअंती सदर इमारतीचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, याप्रकरणी विलंब लागण्याची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :(१) हे खरे आहे,
(२) मूळ प्रशासकीय मान्यतेच्या रकमेत दरम्यानच्या काळात बांधकामाचे दर वाढल्याने पुशवैद्यकीय चिकीत्सालय धुळे इमारतीचे काम अपूर्ण आहे.
(३) धुळे येथील पशुवैद्यकीय चिकित्सालयाच्या नविन बांधकामाकरीता रु. १०९.५० लक्ष रकमेस जिल्हा वार्षिक नियोजन कार्यक्रमातून प्रशासकीय मंजूरी मिळणेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सन २०१५-१६ मध्ये यासाठी जिल्हा वार्षिक योजनेत रु.५०.०० लक्ष मागणी करण्यात आली होती. परंतु रु. १.०० लक्ष तरतूद करण्यात आल्यामुळे पुनश्च जिल्हा वार्षिक योजना प्रारुप आराखडा सन २०१६-१७ मध्ये उपरोक्त बांधकामाकरीता रु. ११०/- लक्ष मागणी केलेली आहे. सदर मंजूरी प्राप्त होताच बांधकाम विभागाकडून पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाचे बांधकाम पूर्ण करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील मत्स्यबीज संगोपन केंद्रामध्ये
कामगार उपलब्ध नसल्याबाबत

(४१) २३९१७ (१०-०८-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील मत्स्यबीज संगोपन केंद्रामध्येही कर्मचारी उपलब्ध नसल्याने या केंद्राची दुरवस्था झालेली असून जलक्षेत्राचे पुरेसे प्रमाण असूनही प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने मत्स्यव्यवसायचे नुकसान झाल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यात ४१० इतक्या तलावांची संख्या असून त्यामध्ये चार कोटीपर्यंतच्या मत्स्यबीजांची आवश्यकता आहे मात्र शासनाच्या या केंद्रामार्फत १०-१५ लाखांपर्यंत मत्स्यबीजांचे उत्पन्न मिळत असते परिणामी जिल्ह्यातील खासगी संस्था, सोसायटी व्यावसायिक शेतकरी आदींना मत्स्यबीजांचे वाटपही कमी प्रमाणात होते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर म्त्स्यबीज संगोपन केंद्राबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार सदर ,केंद्राच्या दुरुस्तीबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे कोठली (ता.भडगांव,जि.जळगांव) येथील १३२ के.व्ही.
उपकेंद्राचे काम तात्काळ होण्याबाबत

(४२) २४३८७ (१०-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोठली (ता.भडगांव,जि.जळगांव) येथील १३२ के.व्ही. उपकेंद्राचे काम सन २०१५-१६ मध्ये तात्काळ होण्यासाठी स्थानिक लोकप्रिनिधींनी दिनांक २६.५.२०१५ रोजीच्या सुमारास मा.ऊर्जा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) तसेच या संदर्भात दिनांक ३ नोव्हेंबर, २०१४ रोजी जळगाव येथे महावितरण कंपनीचे मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता, दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी नागपूर येथे मंत्री महोदय व महावितरण अधिकारी, मुंबई येथे दिनांक २४ मार्च, २०१५ रोजी मंत्री महोदय व

महावितरणाचे अधिकारी, दिनांक १३ एप्रिल, २०१५ पाचोरा जि.जळगांव येथे म.रा.वि.वि कंपनी अधिकारी यांच्यासमवेत दिनांक २० मे, २०१५ रोजी जळगांव येथे महावितरण कंपनीचे मुख्य अभियंता यांच्यासमवेत बैठक घेऊनही अद्यापही या उपकेंद्राचे काम सुरू करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत वारंवार संबंधित अधिकाऱ्यासमवेत बैठका घेऊन अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केलेली नाही हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०९-२०१५) :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही,

(४) भडगांव तालुक्यातील नगरदेवळा (कोठाळी) येथील १३२ के.व्ही. उपकेंद्रास महापारेषण कंपनीच्या संचालक मंडळाने सन २०१० मध्ये मंजुरी दिली आहे. परंतु महापारेषण कंपनीच्या विद्यमान धोरणानुसार, प्रस्तावित परंतु काम सुरु न झालेल्या अति उच्च दाब उपकेंद्राबाबत, राज्य पारेषण उपक्रमातर्फे सध्याच्या उच्च दाब व अति उच्चदाब प्रणालीस अनुसरुन, तांत्रिकदृष्टया आवश्यकता तपासली जात आहे. त्यामध्ये सदर उपकेंद्राचाही समावेश आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

इकॉनामीक शड डाऊन अंतर्गत बंद पडलेल्या ८५० मेगावॅट विज निर्मीती क्षमतेचे चार संच सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याबाबत

(४३) २४७४३ (०६-०८-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाचे महानिर्मीती या विज कंपणीच्या माध्यमातून शासन विजेचा व्यवसाय करण्यासाठी इकॉनामीक शड डाऊन अंतर्गत बंद पडलेल्या ८५० मेगावॅट विज निर्मीती क्षमतेचे चार संच सुरु करण्याचा निर्णय शासनाने (महानिर्मीती) कंपनीने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे प्रकल्प केव्हा सुरु करणार, व यामुळे महाराष्ट्र भारनियमन मुक्त होणार आहे काय, तसेच विजेच्या दर कमी होणार आहेत काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०९-२०१५) :(१) हे खरे आहे.

(२) बंद असलेल्या संचापासून वीज निर्मिती करण्यासाठी आवश्यक असलेला कोळसा पाणी इ.घटकांच्या उपलब्धतेनुसार व आवश्यक कोळशाचा पुरेसा साठा उपलब्ध झाल्यास संच सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

चांगल्या प्रतीचा कोळसा अधिक प्रमाणात उपलब्ध झाल्यास इंधनाचा खर्च कमी होऊ शकेल व पर्यायाने वीजनिर्मिती दर कमी होऊन भार नियमन कमी होण्यास मदत होईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

कफपरेड मुंबई येथील आंबेडकर नगर मधील मीटर बॉक्समध्ये अनेकवेळा स्पार्किंग होवून वीज पुरवठा खंडीत झाल्याबाबत

(४४) २४७७२ (१०-०८-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कफपरेड मुंबई येथील आंबेडकर नगर मधील मीटर बॉक्स अनुक्रमांक ९७०४१८३ एफ-x या मीटर बॉक्समध्ये दिनांक ८ जून, २०१५ रोजी व त्यापूर्वीही अनेकवेळा स्पार्किंग होवून वीज पुरवठा खंडीत झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीक तसेच बेस्ट उपक्रम समितीचे सदस्य यांनी बेस्ट भवनच्या महाव्यवस्थापकांकडे अनुक्रमे १३,१५ व २० एप्रिल, २०१५ रोजी निवेद्वारे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व सदर ठिकाणी विद्युत पुरवठा नियमित व पूर्ववत सुरु रहावा म्हणून योग्य क्षमतेची केबल बसविणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०९-२०१५) :(१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) सदर विद्युत मीटर बॉक्स करीता जोडण्यात आलेल्या विद्युत केबलची क्षमता मागणी केलेल्या विद्युत भारानुसार देण्यात आली आहे. तथापि वाढीव विद्युत भारामुळे गेल्याकाही दिवसामध्ये त्या ठिकाणी विद्युत पुरवठा खंडीत होत असून या बाबत उच्च क्षमतेची विद्युत केबल टाकण्याचे मंजूर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील आरे कॉलनी येथील ना विकास क्षेत्रामध्ये झालेल्या अनाधिकृत अतिक्रमणावर करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत

(४५) २५१४४ (१०-०८-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आरे कॉलनी येथील ना विकास क्षेत्रामध्ये झालेल्या अतिक्रमण अनाधिकृत बांधकामे बंगले, गोदामे, इमारती यांची व परिसर सुरक्षित राहण्यासाठी करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती शासनाने मागीतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(३) तसेच या भागात अद्यापही अनाधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :(१) व (२) आरे परिसरातील सर्व घडामोडींची माहिती शासनाकडे उपलब्ध असणे आवश्यक असल्याने त्याचाच एक भाग म्हणून आरे वसाहतीमधील एकूण जागा, त्यामध्ये अतिक्रमीत झालेली व ताब्यात असलेली जागा व त्यानुषंगाने करण्यात आलेली कार्यवाही तसेच आरे परिसरातील असलेल्या इमारती, तबेले, बंगले, गोदामे यांची सविस्तर माहिती व आरे परिसर सुरक्षीत राहण्यासाठी करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबतची अद्यावत माहिती आयुक्त, दुग्धव्यवसाय व मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे यांच्याकडून वेळोवेळी मागविण्यात येते.

(३) हे खरे नाही.

आरे दुग्ध वसाहतीमध्ये अनधिकृत बांधकामे होणार नाहीत याबाबत शासनातर्फे सर्वोतोपरी उपाययोजना करण्यात येत आहे. त्याअंतर्गत सन २०१२ मध्ये १०११, सन २०१३ मध्ये २६२८, सन २०१४ मध्ये १३४४ व ऑगस्ट २०१५ पर्यंत ८३२ झोपड्यांचे निष्कासन करण्यात आलेले आहे. तसेच आरे वसाहतीत अनधिकृत झोपड्या बांधणे व गैरप्रकार करणे ई. कारणाखालील सन २०१२ मध्ये ४१, सन २०१३ मध्ये २६, सन २०१४ मध्ये ६९ व ऑगस्ट २०१५ पर्यंत ४१ असे एकूण १७७ व्यक्तींवर आरे पोलिस ठाण्यात गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अपारंपारिक उर्जा प्रकल्प, मुलभूत सुविधा प्रकल्प उभारण्याचे ना हरकत प्रमाण पत्र मंजुरी प्रक्रिया व विज खरेदी करण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

(४६) २५६४२ (१०-०८-२०१५). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपारंपारिक उर्जा प्रकल्प, मुलभूत सुविधा प्रकल्प उभारण्याचे ना हरकत प्रमाण पत्र मंजुरी प्रक्रिया व विज खरेदी करण्याचा प्रस्ताव अशा अनेक कारणांमुळे अडकून पडला

असल्यामुळे राज्यातील उद्योजक राज्याबाहेर जाण्याच्या मनस्थितीत असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले अहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपारंपारिक उर्जा प्रकल्पांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने शासन या प्रकल्पासाठी एक खिडकी योजना राबविणार आहे काय,

(३)असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०९-२०१५) :(१) नाही.

राज्यात अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीस चालना देण्याच्या दृष्टीने अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीचे धोरण जाहीर करणेची बाब शासनाच्या विचाराधीन होती. शासनाने शासन निर्णय क्र. अपाऊ-२०१५/प्र.प्र.४९/ ऊर्जा-७ दि.२०/७/२०१५ अन्वये नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीचे पारेषण सलग्न प्रकल्पांसाठी एकत्रित धोरण २०१५ जाहीर केले आहे. या धारेणांतर्गत अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांपासून एकूण १४४०० मे.वॅ.क्षमतेचे प्रकल्प आस्थापित करणेचे उद्दिष्ट निश्चित करणेत आले आहे.

(२) लागू नाही.

शासन निर्णय क्र. अपाऊ-२०१५/प्र.क्र. ४९/ ऊर्जा-७ दि.२०/७/२०१५ या शासन धोरणांतर्गत प्रकल्प आस्थापित व कार्यान्वित करणे, प्रोत्साहनात्मक बाबी लागू करणे व धारेणाची प्रभावी अंमलबजावणी करणे या दृष्टीने वस्तुनिष्ठ व सुटसुटीत अशी कार्यपध्दती वेगळ्याने निर्गमित करण्यात येईल असे नमूद केले आहे.

(३) लागू नाही.

चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यामध्ये पशुवैद्यकीय चे २२ दवाखाने असून त्यातील ५ दवाखान्यांमध्ये कर्मचा-यांची १७ पदे रिक्त असल्याबाबत

(४७) २६२९५ (१०-०८-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) (जि.रत्नागिरी) चिपळूण तालुकयामध्ये पशुवैद्यकीय चे २२ दवाखाने असून त्यातील ५ दवाखान्यांमध्ये कर्मचा-यांची १७ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे पशुवैद्यकीय सेवेवर परिणाम होत असून सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या कर्मचारी वर्गावरही कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे ?

(४) नसल्यास रिक्त पदे भरण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत

श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :(१) चिपळूण तालुक्यात जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय १ व राज्यस्तरीय २० पशुवैद्यकीय दवाखाने अशी एकूण २१ राज्यस्तरीय संस्था आहेत. राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुधन पर्यवेक्षकांची पदे २० पदे मंजूर असून १६ पशुधन पर्यवेक्षकांची पदे रिक्त आहेत व परिचरांची २० पदे मंजूर असून १५ परिचरांची पदे रिक्त आहेत.

(२) पशुसंवर्धन विभागातील राज्यस्तरीय पशुधन पर्यवेक्षकांच्या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य पशुधन पर्यवेक्षक यांचेकडे देऊन कामकाज व्यवस्था सुरु ठेवण्यात आलेली आहे. पशुधनावर योग्य व तातडीने उपचार करण्यात येत आहे. पशुधन गमविण्याची वेळ येत नाही. पशुपालकांना वेळेत सेवा उपलब्ध करुन देण्यात येते.

(३) पशुसंवर्धन विभागातील राज्यस्तरावरील गट-क मधील पशुधन पर्यवेक्षकांची रिक्त पदे तसेच गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना केसरी आणि पिवळ्या रेशनकार्डधारकांसाठी मोफत सौरऊर्जा गिझरसाठी ५० टक्के अनुदान देण्याबाबत

(४८) २६३६५ (३१-०७-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना केसरी आणि पिवळ्या शिधापत्रिका धारकांसाठी सौरऊर्जेवर चालणा-या गिझरसाठी ५० टक्के अनुदान शासनाने जाहिर केले असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील दारिद्रयरेषेखालील कुटुंबांना ५० टक्के रक्कम भरणे शक्य आहे काय,

(३)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सौर ऊर्जेचा उपयोग जास्तीत जास्त व्हावा यासाठी सदर योजनेअंतर्गत दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना मोफत सौरऊर्जा गिझर देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०९-२०१५) :(१) नाही.

(२) लागू नाही.

(३) लागू नाही.

(४) लागू नाही.

जायकवाडी धरणाच्या (जि.औरंगाबाद) पायथ्याशी असलेले
मत्स्यबीज संवर्धन केंद्र पुन्हा सुरु करण्याबाबत

(४९) २६४८४ (१०-०८-२०१५). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडी धरणाच्या (जि.औरंगाबाद) पायथ्याशी ३७ वर्षापूर्वी उभारलेल्या मत्स्यबीज संवर्धन केंद्रामध्ये ४०० टन मत्स्योत्पादन होण्यासाठी वर्षभरात ४० लाख बोटुकल (मासळींच्या विविध प्रजातीची पिले) नाथसामगरात सोडावी, असे प्रकल्पाच्या मूळ आराखड्यात नमूद असतांना गेल्या अनेक वर्षात एकही बोटुकली सोडण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे संभाजीनगर व नगर जिल्ह्याच्या ४ तालुक्यातील ११८ गावांचा मासळी टंचाईचा फटका बसला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने सदरचे मत्स्यबीज संवर्धन केंद्र पुन्हा सुरु करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

श्री. एकनाथराव खडसे (१४-०९-२०१५) :(१) होय हे खरे आहे.

(२) जायकवाडी धरण हे पक्षी उभयारण्य म्हणून घोषित झाल्यामुळे वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अन्वये तेथे मासेमारी करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

(४) जायकवाडी येथील मत्स्यबीज संवर्धन केंद्र जाहीर निविदेद्वारे भाडेतत्वावर देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मच्छिमारांना सहा प्रकारचे वेगवेगळ्या प्रकारचे पुरावे
बाळगणे बंधनकारक करण्यात आल्याबाबत

(५०) २८२५० (०५-११-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)राज्यातील सागरी सुरक्षेच्या नावाखाली मच्छिमारांना माहे ऑगस्ट, २०१५ च्या दरम्यान सहा प्रकारचे वेगवेगळ्या प्रकारचे पुरावे बाळगणे बंधनकारक करण्यात आल्याचे तसेच मासेमारीसाठी समुद्रात जाताना त्यांना कूपन घ्यावे लागत आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कुपनमध्ये भरण्यात येत असलेली माहिती गोपनीय राहणे अपेक्षित असतांनाही सदरचे काम शासनाने खाजगी कंपनीकडे दिले असून सदरचे कुपन भरुन देण्याकरिता ५० ते १०० रुपये दरही आकारण्यात येतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची माहिती गापेनीय असल्याने हे काम खाजगी संस्थेकडे न देता मच्छिमार तरुणांना देण्यासंदर्भात शासन विचार करणार आहे काय,
(४) नसल्यास, त्याबाबतची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे (०५-१२-२०१५) :(१) होय, मासेमारीसाठी समुद्रात जातांना टोकन घ्यावे लागते हे खरे आहे.
(२) नाही.
(२) स्थानिक मच्छिमारांना नेमण्यास प्राधान्य देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.